# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 29.04.2011 (का.प.क्रं.18) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 29 एप्रिल 2011 (का.प.क्रं.18) रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.अजय चारठाणकर, नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्षमणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.आगा खान मिया खान स. श्री.विकास रतनलाल जैन
05. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
06. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
07. स. सौ.साधना गणेश सुरडकर
08. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
09. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
10. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
11. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
12. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

श्री.मधुकर सावंत :आजच्या वर्तमानपत्रात आलेल्या बातमीनुसार आजची सभा ही अनाधिकृत सभा आहे. याबाबीचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

नगर सचिव :आज स्थायी समितीची बोलविण्यात आलेली सभा अधिकृत आहे तसेच सदस्यांचा निवृत्तीचा कालावधी हा 1 मे रोजी दुपारपर्यंत राहील हे सभागृहाच्या निदर्शनास आणुन देण्यात आलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :श्री.के.आर.कुलकर्णी यांना मारहाण झालेली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :पाण्याच्या बाबतीत सदर विषय घडलेला आहे. संबधीत विभाग प्रमुखांनी खुलासा करण्यात यावा की, श्री.के.आर.कुलकर्णी यांना मारहाण झालेली आहे का?

श्री.मधुकर सावंत :खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :अधिकाऱ्यांचे पथक अनाधिकृत व्यवसायिक नळ कनेक्शन चौकशी करीता गेले असता श्री.जुबेर मोतीवाला या इसमाने श्री.के.आर. कुलकर्णी व श्री.पाटे यांना डांबुन ठेवले होते व मारहाणही करण्यात

आली. मा.आयुक्तांशी चर्चा करून मुकूंदवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यासाठी गेलेले आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :या घटनेचा निषेध करण्यात येतो. या प्रकरणी पोलीस आयुक्तांशी मा.आयुक्तांनी, सभापती यांनी चर्चा करून संबधीताविरूध्द गंभिर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

श्री.विकास जैन :प्रशासनास एकीकडे सांगीतले जाते की, पाण्याची स्थिती सुरळीत झ ाली पाहीजे. संबधीत अधिकारी अशा पध्दतीने चांगले काम करीत असेल व नागरीक त्यांना मारहाण करीत असेल तर सर्वांना संरक्षण दिले पाहीजे. प्रशासनाने व सर्व सदस्यांनी त्यांना मदत करायला हवी.

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत अधिकाऱ्याला आमचा पाठिंबा आहे. या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात येतो.

श्री.महेश माळवतकर :सदरचा विषय गंभिर आहे. गेल्या महिण्याभरापासुन नागरीक पाण्यामुळे त्रस्त आहेत. प्रशासनाने अनाधिकृत नळ कनेक्शन तोडण्याची मोहीम हाती घेण्यात आली. प्रशासनाच्या आदेशानुसार अधिकारी कर्मचारी काम करीत असतात. अशा कर्मचाऱ्यांना डांबून मारहाण होत असेलतर प्रशानाने अशा लोकांवर कठोर कार्यवाही केली पाहीजे. या अधिकाऱ्यांच्या पाठीमागे प्रशासनाने आणि सभागृहाने खंबीरपणे उभे राहीले पाहीजे. जी घटना घडली आहे त्या घटनेचा तिव्र शब्दात निषेध व्यक्त करतो.

श्री.विकास जैन :प्रशासनातर्फे या संदर्भात कठोर कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना विचारात घेता सभागृहाच्या वतीने या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात येतो. संबधीत व्यक्ती् विरूध्द गुन्हा दाखल करून अनाधिकृत नळ कनेक्शन तोडण्याबाबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त घेण्यात यावा. जेणेकरून भविष्यात अशी घटना घडणार नाही. पोलीस आयुक्तांशी यासंदर्भात प्रत्यक्ष संपर्क साधाणार आहे. संबधीत व्यक्तीविरूध्द गंभीर गुन्हा दाखल करावा.

श्री.महेश माळवतकर :या वर्षीची स्थायी समितीची शेवटची सभा घेण्यात येत आहे. मा.सभापती यांनी शहरातील विकासाचे काम केलेले आहे. प्रशासनाने वसुलीत दुर्लक्ष केले परंतु आपण गेल्या सहा महीन्यात कर वसुलीबाबत विवीध बैठका घेऊन विशेष प्रयत्न केलेत. वार्डामध्ये अनेक विकास कामे होण्यासाठी गेले वर्षभर सर्व सदस्यांना सहकार्य केलेत. प्रशासनातील सर्व अधिकारी/कर्मचारी/ पत्रकार यांनी सहकार्य केलेत. त्याबाबतीत सर्वांचे अभिनंदन करण्यात येते. उर्वरित कामे व विकासाचे कामे मा.सभापती व त्यांचे सहकारी यांचे मार्फत पुढील वर्षी व्हावे. अशी सुभेच्छा व्यक्त करतो. स्थायी समितीच्या स.सदस्यांचे वार्डातील विकास कामात विशेष जातीने लक्ष दिल्याबाबत सर्व सदस्यांचे वतीने हार्दीक अभिनंदन व्यक्त करतो.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वसाधारण सभेत एक विषय मांडण्यात आला होता. स्थायी समितीने मान्यता दिली होती. शहरातील काही भागामध्ये सभागृह एक हजार

रूपये नाममात्र दराने भाडयाने द्यावे. अशा प्रकारचा ठराव मंजूर झाला होता. सर्वसाधारण सभेने ठराव घेतला होता. स्थायी समितीने मंजूरी दिली. त्या आधारावर सभागृहात मान्यता दिली होती. दुर्देवाने सभागृहाने घेतलेले निर्णय प्रशासनास महत्वाचे वाटत नाही. नाममात्र दराने सभागृह भाडयाने द्यावे परंतु त्यांची अंमलबजावणी झाली नाही. सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. शहरातील जे सभागृह आहेत ते सामाजिक संस्थेला नाममात्र दराने भाडयाने देऊन सभागृहाची देखभाल दुरूस्ती योग्यपध्दतीने होईल. मनपावर त्याचा बोझा पडणार नाही. त्या भागातील नागरीकांना त्याचा वापर करता येईल. नविन जे प्रस्ताव येत आहे त्यामध्ये नियमानुसार त्या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही होतांना दिसत नाही. सदरील विषय अतिशय महत्वाचा आहे. सभागृह बांधुन लाखो रूपये खर्च करण्यात येतात. काही महिने सभागृह चालविले जातात त्यानंतर सभागृहाकडे दुर्लक्ष होते. स.सदस्य श्री.मधुकर सावंत यांच्या वार्डातील सभागृह वापराअभावी तसेच पडलेले आहे. इमारतीचे खंडर होऊ नये म्हणुन निर्णय घेतलेला आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे यापुढे कार्यवाही व्हावी. ही विनंती आहे.

श्री.विकास जैन :कित्येक वर्षापासून सदरील विषयावर चर्चा होत आहे. निर्णयाप्रमाणे जी सामाजिक संस्था सभागृह भाडयाने घेत असेल त्यांना ती देण्यात यावी. जेणे करून चांगल्या कामासाठी त्याठिकाणी वापर झाला पाहीजे. सभागृहाने आदेश दिल्यानंतर प्रशासनाने त्यास स्थगीती दिली. घेतलेल्या निर्णयाला स्थगीती दिली जाते. मागील निर्णय बरोबर आहे का? आत्ताचा निर्णय बरोबर आहे. जनतेच्या हितासाठी सभागृह बांधण्यात येत आहे. काही सभागृह आमदार, खासदार निधीतुन बांधण्यात आलेले आहे. हे सर्व जनतेच्या उपयोगासाठी बांधण्यात आलेले आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे ज्या ज्या संस्थेने मागणी केली आहे त्यांना भाडेतत्वावर देण्यात यावे. माझ्या माहीती प्रमाणे अशा सर्व प्रस्तावांना थांबविण्यात आलेले आहे हे योग्य नाही. प्रशासनाने खुलासा करावा की, मागच्या वेळेस कुठल्या धर्तीवर देण्यात आलेले आहे. मग आज का नाही. मागची चुकीचे झाले आहे का? आत्ताचे चुकीचे आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी सभागृह भाडयाने देणे बाबत मुद्दे उपस्थित केलेले आहे. त्या संदर्भात मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, स्थायी समितीमध्ये दोन वेळेस निर्णय झालेला आहे. सर्वसाधारण सभेत सन 1999 व सन 2007 रोजी ठराव मंजूर झालेला आहे. सन 2010-11 मध्ये निर्णय घेतला होता की, सामाजिक संस्थेला भाडयाने द्यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :स्पष्ट उल्लेख करायला हवा की, 1000/- रूपये भाडे मेंन्टेनन्स, देखभाल संबधीत संस्थेने करावे. असा आदेश देण्यात यावा. नाममात्र भाडे असा उल्लेख केल्यामुळे प्रशासनास स्पष्ट बोध होत नाही.

मा.सभापती : इतिवृत्तामध्ये त्याची नोंद आलेली आहे.

श्री.विकास जैन :रूलिंगमध्ये दुरूस्ती करून देण्यात आली. दुरूस्ती करून प्रशासनास ठराव दिलेला आहे.

मा.सभापती :संस्थेला भाडयाने दिल्यास संस्था सभागृहाची देखभाल व दुरूस्ती करेल जेणेकरून मनपाची मालमत्तांचे सरंक्षण होईल् व सामाजिक उपक्रम राबविले जाईल. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, सभागृह वाईट अवस्थेत आहे. त्याचा दुरूपयोग केला जात आहे. महानगरपालिकेची मालमत्ता आहे एखादा अनुचित प्रकार घडल्यास त्यास मनपा जबाबदार असेल. त्यामुळे प्रशासनाने यावर खुलासा करण्यात यावा. सर्वसाधारण सभेत स्थायी समितीमध्ये मंजूरी झ ाल्यानंतरही संचिकेवर काही निर्णय होत नाही. वार्डातील नागरीकांना त्याचा फायदा होणार आहे.प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा. सभागृहाचा निर्णय झाल्यानंतरही एक विषय विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आला. सभागृहाने निर्णय घेऊन फायदा काय? आपल्या स्थरावर कार्यवाही थांबविण्यात आली आहे.

श्री.विकास जैन :लोकहिताचा विषय आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :नागरीकांच्या हिताचा प्रश्न आहे.

श्री.मधुकर सावंत :माझ्या वार्डातील सभागृह वापराअभावी वाईट अवस्था झाली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वार्डात सामाजिक संस्थेला हॉल भाडयाने दिलेला आहे त्यांनी हॉल व परिसर अतिशय व्यवस्थीतरित्या मेन्टेन केलेला आहे. जो ठराव घेतलेला आहे तो लोकहितासाठी घेतलेला आहे. एका व्यक्तीसाठी घेतलेला नाही.

मा.आयुक्त :रीकाम्या हॉलच्या संदर्भात नमुद करू इच्छितो की, ज्या ठिकाणी एखादी सामाजिक संस्था सभागृह भाडयाने देण्याकरीता समोर येत् त्यांना भाडयाने देणेकरीता काही हरकत नाही. ज्या ठिकाणी काही वाणिज्य (commercial) काही value आहे आणि अनेक संस्था भाडयाने मागतात पैसेही जास्त मिळू शकतात. अशा ठिकाणी ज्याकडुन जास्त पैसे मिळतात त्यांना देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे सभागृह आहेत ते अंतर्गत कॉलनीमध्ये आहे. त्यामुळे वाणिज्य वापर हा भाग नाही. एखाद्या सभागृहाच्या बाबतीत मा.आयुक्तांनी सांगीतले त्याप्रमाणे हाऊ शकते.

मा.सभापती :माझ्या वार्डात टाऊन सेंटर सी सेक्टर येथे गोवर्धन संस्थेने सामाजिक कार्यासाठी भाडयाने मागीतले आहे. ठराव क्रमांक 317 , विविध ठिकाणी असलेले महानगरपालिकेचे सभागृह भाडयाने देण्याबाबत प्रस्ताव आहे. त्यास प्रतिमहा 1000 रूपये प्रमाणे व दुरूस्ती व देखभाल संबधीत संस्थेने करावा व सदरील हॉल भाडयाने देण्यास मंजूरी देण्यात येते. स.सदस्या श्रीमती साधना सुरडकर यांच्या वार्डातील एक विषय आहे. पाच बाय सात चा एक गाळा आहे.

**श्री.सुर्यकांत जायभाये** :बऱ्याच वर्षापासून गाळा रिकाम्या अवस्थेत आहे. सुशिक्षीत बेराजेगार संस्थेला/व्यक्तीला गाळा भाडयाने देण्यास काही हरकत नाही.

**मा.सभापती** :सहकारी संस्थेची नोंदणी आहे कि नाही. हे पाहून देण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :संस्था किंवा बेरोजगार यांना देण्यात यावे.

**मा.सभापती** : देण्यांत यावे.

**श्री.महेश माळवतकर** :सिडको एन 9 येथील कम्युनिटी हॉलबाबत वेळोवेळी सर्वसाधारण सभेमध्ये मुद्दा उपस्थित केला आहे. सिडकोचे मनपामध्ये हस्तांतरण झ ाल्यानंतर कम्युनिटी सेंटर मनपाकडे हस्तांतरण झाले त्याठिकाणी नाममात्र दरात गरीबांचे लग्नकार्य पार पडत होते परंतु आता कम्युनिटी सेंटरची दुरावस्था झालेली आहे. दुरूस्तीचा खर्च हा कमी आहे. परंतु त्याची दुरूस्ती न केल्यामुळे तेथील खिडक्या, दरवाजे, शौचालय याची नासधुस होत असल्यामुळे कुणीही घेत नाही. मनपास आर्थीक फायदा होत नाही. दूरूस्ती केल्यास नागरीकांना फायदा होईल. तसेच मनपाचा आर्थिक फायदाही होईल. याकडे गांभिर्याने पाहीले पाहीजे. एक वेळ भेट देण्यात यावी कम्युनिटी सेंटर मध्यवस्तीत आहे. बजेटमध्ये यासाठी तरतुद ठेवण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :पिसादेवी ड्रेनेज लाईनच्या संदर्भात मागील बैठकीत ठराव आलेला होता. जागा नसल्यामुळे ते काम थांबविण्यात आले होते.ड्रेनेज लाईनची आवश्यकता आहे तरी, ड्रेनेज लाईन टाकण्याच्या संदर्भाने कार्यवाही व्हावी. अशी विनंती आहे.

**श्री.विजय वाघचौरे** :शहरातील नाले तुडूंब भरलेले आहेत. पावसाळा सुरू होण्याचे बाकी आहे. आमच्या भागातील नाले, नाल्या चोकअप झालेल्या आहेत. घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यावर काय कार्यवाही करणार आहे. खुलासा करण्यात यावा.

**श्री.महेश माळवतकर** :एन-9 येथील नाल्याचे इस्टिमेट बाबत मागील बैठकीत चर्चा करण्यात आली होती. काय कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा. नाल्याची सफाई मे महिन्यातच झाली पाहीजे. शॉर्ट टेंडर काढले पाहीजे. खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता** (श्री.पानझडे) : वार्ड ब मधील जो नाला आहे त्याबाबत अंदाजपत्रक तयार केलेले आहे. 18.50 लाखाचे काम आहे. कार्यवाही अंतर्गत असुन दोन ते तीन दिवसात मंजूरी मिळाल्यानंतर काम करण्यात येईल.

**श्री.महेश माळवतकर** :संचिका मंजूर होण्यास काय अडचण आहे.

**मा.आयुक्त** :सदरील विषय अत्यंत महत्वाचा आहे. बजेटमध्ये 60 लाखाची तरतुद गाळ काढण्यासाठी, नाल्यांची साफसफाई करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. जे प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. ते मोठया प्रमाणावर प्राप्त झालेले आहे. संबधीत अभियंत्यांशी चर्चा करण्यात आली. अभियंत्यांनी बसुन लिगली प्रस्ताव देण्यात यावे. त्यांचे दोन वार्डाचे जवळपास रूपये 1.25 कोटीचे प्रस्ताव आले आहे आणि इतर 30-40 लाखाचे प्रस्ताव आहेत.

एक ते दोन दिवसात गाळ काढण्याचे काम करण्यात येईल. उघडे ढापे बसविण्याचे काम महत्वाचे आहे. गाळ काढण्याचे अतिमहत्वाचे काम आहे.

श्री.महेश माळवतकर :पावसाळा संपेपर्यंत नाले सफाईचे काम करण्यात यावे. नाल्याचा गाळ काढल्यानंतर गाळ नाल्याच्या बाजुला लावण्यात येऊ नये. याकडे लक्ष दिले पाहीजे.

श्री.रेणुकादास वैद्य :नाल्यामधील गाळ काढल्यानंतर नाल्याच्या बाजुला टाकला जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. प्रशासनाने नाले सफाईची मागील वर्षी मोठया प्रमाणात मोहिम हाती घेतली होती. परंतु ती का घेण्यात आली नाही हा प्रश्न आहे. जवाहर नगर पोलीस स्टेशन येथील नाला अतिक्रमणाच्या विळाख्यात आहे. ते अतिक्रमण काढण्यात यावे.

श्रीमती साधना सुरडकर :नाल्यांमध्ये जेव्हा अतिक्रमण होते तेव्हा पहिली स्टेज होती तेव्हाच थांबवयला हवी होती. आजच्या दिवसापर्यंत तिसऱ्या मजल्यापर्यंत काम होत आहे. मागील पावसाळयात काही मुलेही वाहुन गेली होती. दोन वेळा शिवराज कॉलनी या भागात पाणी शिरल्यामुळे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते. त्यावेळेस ठरविण्यात आले होते की, साईड वॉल बांधण्यात येईल परंतु अद्यापपर्यंत काहीच कार्यवाही झालेली नाही. येत्या पावसाळयातही पाणी शिरण्याची स्थिती निर्माण होईल त्यामुळे अतिक्रमण काढावे किंवा संरक्षीत भिंत बांधण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील नाल्यांच्या व माझ्या वार्डातील नाल्यांच्या संरक्षित भिंती ज्या तुटलेल्या अवस्थेत आहे किंवा संरक्षित भिंतींची गरज आहे तेथे संरक्षित भिंती बांधण्याची कार्यवाही अग्रक्रमाने केल्या गेल्या पाहीजेत.

श्री.प्रल्हाद निमगांवकर:नाल्यामध्ये दोन मुलांचा मृत्यु झाला त्याबाबत काय उपाययोजना केल्यात. ज्या इमारती नाल्यावर उभारण्यात आल्या आहेत त्या काढण्यात याव्यात.

श्री.विकास जैन :नाल्यावरील व आजुबाजूचे जे अतिक्रमण आहे ते काढण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :विषय गंभिर स्वरूपाचा आहे. नेहमी वित्तहाणी होत आहे.

श्री.नासेर खान :स.सदस्या श्रीमती साधना सुरडकर यांनी नाल्याचे एक काम सांगीतले होते ते होत नाही. एक-एक वर्ष झाले. प्रत्येक मिटींगमध्ये विषय येतो. तो आपोआप संपतो. फक्त चर्चा होती परंतु काहीही कार्यवाही होत नाही.

श्री.मधुकर सावंत : सभागृहामध्ये समांतर जलवाहिनीचा विषयाबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (श्री.पानझडे) : स्थायी समितीने औरंगाबाद वॉटर सप्लायची वाढीव पाणीपुरवठ्या संदर्भात संमातर पाणीपुरवठा योजनेच्या पीपीपी प्रोजेक्टला मान्यता दिली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे. त्यानुसार एल.ओ. एजन्सीला दिलेले आहे.

**श्री.मधुकर सावंत** :मनपाच्या अधिनियमाप्रमाणे स्थायी समितीच्या ठरावाची प्रत द्यावी लागते का? सभागृहात खुलासा करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता (श्री.पानझडे)** : स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. ठरावाची प्रत एजन्सीला देण्याची गरज नाही.

**श्री.मधुकर सावंत** :सभागृहाचा अपमान आहे. जर स्थायी समितीमधे एखाद्या विषयावर चर्चा हाऊन मंजूरी मिळाली असेल तर त्याला ठराव न देता एल.ओ. देणे हे कितपत योग्य आहे. ठरावावर मा.सचिव, मा.सभापती यांची स्वाक्षरी घेऊन कारणापूरता उतारा द्यावा लागतो. त्यानंतर पुढील कार्यवाही होते. असे काही न होता दिलेले आहे. खुलासा व्हावा.

**श्री.रेणुकादास वैद्य** :समांतर जलवाहिनी व्हावी ही नागरीकांची इच्छा आहे. या सभागृहाचा विषय आहे. करारनामा बाकी असेल ते पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. आपल्या कार्यकाळात ही योजना झाल्यास समाधान होईल.

**श्री.मधुकर सावंत** :सभागृह चालविण्यास स.सदस्यांनी जी मदत केलेली आहे. खेळमेळीने जनतेचे काम केले त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करण्यात येते. आगामी काळासाठी शुभेच्छा देण्यात येतात.

**श्री.रेणुकादास वैद्य** :शहरातील वातावरण चांगले राहावे. नागरीकांचे प्रश्न सोडविले घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणीसाठी प्रशासनाने, मा.सभापती यांनी जी मदत केली त्याबद्दल सर्वांचे धन्यवाद. पुढील वर्षी यापेक्षा चांगले काम करावे. जे सदस्य निवृत्त झाले त्यांनी वरच्या सभागृहात प्रश्न मांडावेत. ज्या कामासाठी या ठिकाणी आलो आहोत त्यासाठी वाचा फोडावी व आगामी काळासाठी सर्वांना शुभेच्छा देण्यात येते.

**विषय क्र. 247 :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.09, शांतीपुरा अंतर्गत वसुंधरा कॉलनी व संगीता कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.17,00,000/- च्या कामासाठी अल्पमुदतीच्या निविदा मागविण्यात आल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. अरोरा कंस्ट्रक्शन — 2.66% जास्त दराने
2. कालीका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर — 30% जास्त दराने

वरीलपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.66% जास्त दर अरोरा कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे आहेत. परंतु लेखा विभागाने अंदाजपत्रकीय रक्कम दराने मान्यतेची शिफारस केल्यानुसार आणि त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक 31/03/2011 रोजी मान्यता झाल्यानुसार अरोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडून काम करून घेणेस अरोरा कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची निविदा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती** : विषय क्रमांक 247 सह सर्व विषय मंजूर. ऐनवेळचेही सर्व विषय मंजूर करण्यांत येतात. सर्व सदस्यांच्या, सभागृहाच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त करण्यात येतात. सर्वांनी जे सहकार्य केलेत. सहकार्य करून शहराच्या विकासासाठी भर घातली. समांतर जलवाहीनीस मंजूरी दिली. यासाठी सर्वांचे सहकार्य मिळाले. सिध्दार्थ उद्यानात तथागत भगवान

गौतम बुद्धांच्या पुतळयाचे आनावरण आपल्याच काळात झाले. रस्त्यांचे कामे झाले. त्यात सर्वांचे सहकार्य लाभले आहे. स्थायी समितीतुन जे स.सदस्य निवृत्त झालेले आहे. त्यांनी सर्वांनी सहकार्य केलेले आहे असेच सहकार्य भविष्यातही लाभो. अशी आशा व्यक्त करतो. मा.आयुक्त, मा.नगर सचिव, शहर अभियंता, उपआयुक्त, व सर्व प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात येतात. चांगले कामे, निर्णय जनतेपर्यंत पोहचविले त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात येतात.

सभापती होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे पुन्हा आभार व्यक्त करण्यात येतात. पुढच्या वर्षीच्या वाटचालासाठी सर्वांचे सहकार्य, शुभेच्छा लाभेल अशी इच्छा व्यक्त करतो. आजच्या सभेचे सर्व विषय मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.09, शांतीपुरा अंतर्गत वसुंधरा कॉलनी व संगीता कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक अरोरा कंस्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 248 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.37 पैठणगेट अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणेच्या अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.9,84,000/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 2 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. मे.कालीका इंजिनिरींग अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.00% जास्त दराने
2. ड्रिमलँड कंस्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35.72% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.कालीका इंजिनिरींग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 22.00% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 24.95% एवढे दर येत आहे. परंतु सदर निविदा 22.00% जास्त दराने मंजुर करण्याची शिफारस करण्यात आली असता मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे. उक्त मंजुर निविदा दरामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,83,657/- पेक्षा र.रू.2,45,502/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे.

तरी मे.कालीका इंजिनिरींग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.00% जास्त दराची निविदा र.रू.2,45,502/- च्या वाढीव खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.37 पैठणगेट अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 22% जास्त दराची मे.कालीका इंजिनिअरींग यांची निविदा स्विकारणेस व त्यासाठी लागणाऱ्या वाढीव खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 249 :</u>**

**कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.70, कल्पतरू हौ.सो. तिरूपतीनगर व इतर वसाहतीतील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 9,99,600/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च शहरी भागात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकुण फक्त (एक) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.**

**1. श्री.एम.ए.सिद्दीकी - 26% जास्त दराने.**

**वरीलप्रमाणे प्राप्त निविदा तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26% जास्त दराची श्री.एम.ए.सिद्दीकी यांची निविदा प्राप्त आहे. सन 2008-09 च्या दरसुचीशी तुलना करता सन 2010-11 दरसुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकामधील रक्कमेत 24.78% एवढी वाढ झ ालेली असून कंत्रादारा बरोबर वाटाघाटीअंती कंत्राटदाराने अं.प.दरापेक्षा 22% जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. सन 2010-11 च्या दरसुचीबरोबर तुलना करता हा दर अं.प. दरापेक्षा 2.78% कमी दराने निविदा दर येतो. सदर 22% जास्त दरास मा.आयुक्त यांचे मंजुरी प्राप्त आहे. या कामावर र.रू.12,19,512/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.**

**तरी अं.प. दरापेक्षा 22% जास्त दराने श्री.एम.ए.सिद्दीकी यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.70, कल्पतरू हौ.सो. तिरूपतीनगर व इतर वसाहतीतील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री.एम.ए.सिद्दीकी यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 22% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 250 :</u>**

**कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्र.क्र.75, संजयनगर येथील गल्ली क्रमांक-3 चे कॉंक्रीट करणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 9,88,688/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एक निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.**

**1. श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर - 10.00% जास्त दराने.**

**वरीलप्रमाणे प्राप्त निविदा तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% जास्त दराची श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांची निविदा प्राप्त झाली होती. वाटाघाटी अंती संबंधीत गुत्तेदाराने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा**

**5.00% जास्त दराने करण्यास संमती दिली असुन त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.**

**सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 9,88,688/- पेक्षा 5.00% जास्त दराने म्हणजेच रक्कम रूपये 49,434/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे.**

**करिता श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांची अं.प. दरापेक्षा 5.00% जास्त दराची निविदा एकुण रक्कम रूपये 10,38,122/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.75, संजयनगर येथील गल्ली क्रमांक-3 चे काँक्रीट करणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास रू.10,38,122/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 251 :**

**कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्र.क्र.79, संघर्षनगर सिडको येथील खुल्या जागेचा विकास करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 9,99,631/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण (एक) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.**

**1. श्री. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश - 45% जास्त दराने.**

**वरीलप्रमाणे प्राप्त निविदा तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 45% जास्त दराची श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा प्राप्त आहे. प्रस्तावित अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दर सुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सन 2010-11 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार दरवाढीचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. त्यानुसार सन 2008-09 च्या दरसुचीमध्ये सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात 27% एवढी वाढ झालेली आहे. कंत्राटदारासोबत दराच्या वाटाघाटी अंती कंत्राटदार यांनी अं.प. दरापेक्षा 27% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे. सन 2010-11 दरसुचीबरोबर तुलना करता हा दर अं.प.दराने येतो या दराने प्रस्तावित कामावर र.रू.12,69,531/- एवढा खर्च अपेक्षित आहे. अं.प. दरापेक्षा 27% जास्त दरास मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे. तरी अं.प. दरापेक्षा 27% जास्त दराने श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.79, संघर्षनगर सिडको येथील खुल्या जागेचा विकास करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 27% जास्त दराने करून घेण्यास त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 252 :**

**कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्र.क्र.79, संघर्षनगर सिडको येथील मनपाच्या खुल्या जागेला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 9,99,317/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण फक्त (एक) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.**

**1. श्री. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश - 45% जास्त दराने.**

**वरीलप्रमाणे प्राप्त निविदा तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 45% जास्त दराची श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा प्राप्त आहे. प्रस्तावित अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दर सुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सन 2010-11 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार दरवाढीचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. कंत्राटदारासोबत दराच्या वाटाघाटी अंती कंत्राटदार यांनी अं.प. दरापेक्षा 30% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे. सन 2010-11 दरसुचीबरोबर तुलना करता हा दर अं.प.दराने येतो या दराने प्रस्तावित कामावर र.रू.12,99,112/- एवढा खर्च अपेक्षित आहे. अं.प. दरापेक्षा 30% जास्त दरास मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे.**

**तरी अं.प. दरापेक्षा 30% जास्त दराने श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.79, संघर्षनगर सिडको येथील मनपाच्या खुल्या जागेला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 30% जास्त दराने करून घेण्यास त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. 253 :</u>**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानाचे प्रवेश शुल्क व अंतर्गत मनोरंजन खेळणीचे आकारण्यात येणारे सध्यस्थितीतील दर हे सन 2001 पासुनचे असुन यामध्ये मागील 10 वर्षापासुन कोणतीही दरवाढ करण्यात आलेली नाही.**

**सध्यस्थितीमध्ये उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीवर तसेच आस्थापनेवरील खर्चात झालेली नैसर्गिक वाढ पाहता अर्थसंकल्प 2011-12 अंतर्गत दरवाढ करणे आवश्यक आहे. जेणेकरून दरवाढीमुळे प्राप्त होणाऱ्या वार्षिक उत्पन्नामध्ये वाढ होवुन अंशतः देखभाल व दुरूस्ती व आस्थापनेवरील खर्चाची वसुली करता येणार आहे.**

**सिध्दार्थ उद्याना अंतर्गत संगीत कारंजे, मेरी गो राऊंड व मिनी ट्रेन इत्यादी सुविधा पुरविण्यात येत असुन त्यातुन व सिध्दार्थ उद्यान प्रवेश शुल्कासाठी सध्यस्थितीतील व प्रस्तावित दर आकारणी खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | तपशिल | सन 2001 पासुन लागु दर | अर्थसंकल्प सन 2011-12 अंतर्गत प्रस्तावित दरवाढ |
|---|---|---|---|
| 01. | सिध्दार्थ उद्यान प्रवेश शुल्क | प्रौढांकरीता रू.3.00 | प्रौढांकरीता रू.10.00 |
| | | 10 वर्षाखालील मुलांना मोफत | 10 वर्षाखालील मुलांना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रू.3.00 |
| 02. | मिनी ट्रेन (1 ते 11 वर्षापर्यंत) | रू.2.00 | रू.10.00 |
| 03. | मेरी गो राऊंड (1 ते 11 वर्षापर्यंत) | रू.2.00 | रू.10.00 |
| 04. | संगीत कारंजे | प्रौढांकरीता रू.5.00 | प्रौढांकरीता रू.10.00 |
| | | 10 वर्षाखालील मुलांना रू.3.00 | 10 वर्षाखालील मुलांना रू.5.00 |

सध्यस्थितीमध्ये आकारण्यात येत असलेल्या दरातुन महानगरपालिकेस सरासरी वार्षीक 40.00 लक्ष रूपये उत्पन्न होत असुन नविन प्रस्तावित दराने आकरणी केल्यास महानगरपालिकेस अर्थसंकल्प सन 2011-12 अंतर्गत सरासरी रक्कम रूपये 1.25 कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे.

करीता सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेची असलेली आर्थीक परिस्थिती पाहता तसेच सन 2001 पासुन सिध्दार्थ उद्यान अंतर्गत कोणतीही दरवाढ केली गेलेली नसल्याने वरील प्रस्तावित दर आकारणी अर्थसंकल्प सन 2011-12 पासुन लागु करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानाचे प्रवेश शुल्क व अंतर्गत मनोरंजन खेळणीचे आकारण्यात येणारे सध्यस्थितीतील दर 10 वर्षापुर्वीचे असल्याने, उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीवर तसेच आस्थापनेवरील खर्चात झालेली नैसर्गिक वाढ पाहता अर्थसंकल्प 2011-12 अंतर्गत प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या दरास आणि सदर दर आकारणी अर्थसंकल्प सन 2011-12 पासुन लागु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | तपशिल | स्थायी समितीने मंजुर केलेली दरवाढ |
|---|---|---|
| 01. | सिध्दार्थ उद्यान प्रवेश शुल्क | प्रौढांकरीता रू.10.00 |
| | | 10 वर्षाखालील मुलांना रू.3.00 |
| 02. | मिनी ट्रेन (1 ते 11 वर्षापर्यंत) | रू.10.00 |
| 03. | मेरी गो राऊंड (1 ते 11 वर्षापर्यंत) | रू.10.00 |
| 04. | संगीत कारंजे | प्रौढांकरीता रू.10.00 |
| | | 10 वर्षाखालील मुलांना रू.5.00 |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 254 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र.37 अंतर्गत औरंगपुरा, पैठणगेट येथील महात्मा फुले यांच्या पुतळयाशेजारी सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन रू.14,80,400/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी शिफारस केली आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 14,80,400/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.37 अंतर्गत औरंगपुरा, पैठणगेट येथील महात्मा फुले यांच्या पुतळयाशेजारी सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामासाठी तयार

करण्यात आलेल्या रक्कम रूपये 14,80,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 255 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र.61 समर्थनगर येथे वामन हरी पेठे ज्वेलर्स ते श्री.तांदुळवाडीकर यांचे घरापर्यंत रस्त्यांचे पुन:डाँबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.17,93,000/- होत आहे. सदरील काम सन 2011-12 च्या अर्थसंकल्पात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त करून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी रक्कम रू.17,93,000/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.61 समर्थनगर येथे वामन हरी पेठे ज्वेलर्स ते श्री.तांदुळवाडीकर यांचे घरापर्यंत रस्त्यांचे पुन:डाँबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,93,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 256 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.3 मधील टपरी मार्केट समोरील रस्त्याच्या पावसाचा पाण्याचा निचरा करून पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाचे सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 8,95,411/- चे अंदाजपत्रकास मान्यता होवून कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण एक (1) निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही ए.एस.कंस्ट्रक्शन यांची असून ती अ.प. दरापेक्षा 45.04% जास्त दराची प्राप्त झाली. त्यावर दराबाबत वाटाघाटी करून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.10% जास्त दरास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली असून मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी ए.एस.कंस्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.10% जास्त दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.3 मधील टपरी मार्केट समोरील रस्त्याच्या पावसाचा पाण्याचा निचरा करून पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ए.एस.कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 20.10% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 257 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.24 सिडको एन-1 भागात फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 19,99,350/- चे

अंदाजपत्रकास मान्यता होवून कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (4) चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अरबाज कंस्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.86% कमी दराची आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होवून अरबाज कंस्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.86% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.24 सिडको एन-1 भागात फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा 15.86% कमी दराची अरबाज कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 258 :

कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर ए व बी लगतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 9,99,900/- चे अंदाजपत्रकास मान्यता होवुन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (3) तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा राजेंद्रसिंग अजितसिंग यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 36.36% जास्त दराची प्राप्त झाली. त्यावर सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार तुलना करून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.02% जास्त दरास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होवुन मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.02% जास्त दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर ए व बी लगतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 20.02% जास्त दराची श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 259 :

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.पहाडसिंगपुरा सर्व्हे नं.98 व 99 येथील मुस्लीम धोबी कब्रस्तान विकसीत करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.19,99,545/- सा.बां. विभाग दरसुची सन 2008-09 नुसार तयार करण्यात आले होते. मा.स्थायी समिती सभा विषय क्र.82 दिनांक 18/08/2009 अन्वये या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामाच्या निविदा जा.क्र./मनपा/अशअ/240/2009, दिनांक 01/08/2009 द्वारे ई-टेंडरींग विभागामार्फत मागविण्यात आल्या असता ई-टेंडरींग विभागाने दिलेल्या अहवालानुसार एकुण 10 निविदा विक्री झाल्या व स्वीकृतीच्या अंतीम तारखेस दिनांक 29/08/2009 रोजी एकुण 09 निविदा दर भरून प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांची निविदा अ.प. दरापेक्षा 20.99% कमी आणि तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची असल्यामुळे त्या निविदेस दिनांक 07/11/2009 रोजी मा.आयुक्त महोदय यांची आणि मा.स्थायी समिती सभा दिनांक

**04/12/2009 रोजी विषय क्र.229, अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानुसार श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांना जा.क्र./मनपा/अशअ/वार्ड-अ/रइवउ/583,दिनांक 11/12/2009 द्वारे र.रू.19,99,545/- च्या कामाचा कार्यादेश देण्यात आला. आणि कामास सुरूवात करण्यात आली परंतु कामाच्या ठिकाणी वादामुळे अंदाजपत्रकातील प्रस्तावित लांबीच्या भिंतीचे काम पुर्ण होऊ शकले नाही. एकुण रक्कम रू.19,99,545/- मधुन फक्त रक्कम रू.6,84,772/- चे काम झाले आहे. परिशिष्ट-ब व्यतिरिक्त इतर कामे कंत्राटदार यांना करणेस सुचविले असता जुने DSR आणि मंजुर निविदा दराप्रमाणे काम करणेस कंत्राटदाराने नकार दिल्यामुळे सदर काम आहे त्या स्थितीत अंतीम करण्यात आले आहे.**

**सदर काम अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.अविवि-2009/ प्र.क्र.43/09/का-1, दिनांक 12/06/2009 अन्वये राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सोयी उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याकरीता प्राप्त शासकीय अनुदान रक्कम रू.20.00 लक्ष मधुन प्रस्तावित करण्यात आले होते. उर्वरीत व नवीन प्रस्तावित कामे करण्यासाठी अद्याप रक्कम रू.13,15,228/- शासनाचा निधी शिल्लक आहे. सदर बाब आणि खालील प्रस्तावित कामाबाबत जा.क्र./मनपा/शअ/225/2011, दिनांक 20/04/2011 द्वारे मा.जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.**

**मुस्लीम धोबी कब्रस्तान कमिटीचे अध्यक्ष मोहंमद यासीन आणि तेथील नागरीक यांचे मागणीनुसार त्यांनी प्रस्तावीत केलेली कब्रस्तानातील कामासाठी र.रू.13,15,428/- चे अंदाजपत्रक सन 2010-11 च्या दरसुचीनुसार (DSR 2010-11) तयार करण्यात आले असुन या अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदयांची दिनांक 26/04/2011 रोजी मान्यता प्राप्त झ ाल्यानुसार कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकच निविदा प्राप्त झाली, तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

**1. श्री.काझी नुर मोहीयोद्दीन 4% कमी दराने**

**अंदाजपत्रकापेक्षा 4% कमी दराची श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांचे निविदेस मा.आयुक्त महोदयांची दिनांक 26/04/2011 रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. शासनाच्या शिल्लक निधी मधुन सदर प्रस्तावित काम 4% कमी दराने करून घेणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.पहाडसिंगपुरा सर्व्हे नं.98 व 99 येथील मुस्लीम धोबी कब्रस्तान विकसीत करणेच्या कामाअंतर्गत उर्वरीत व नवीन प्रस्तावित कामे करण्यासाठी अद्याप शासनाचा निधी शिल्लक असल्यामुळे मुस्लीम धोबी कब्रस्तान कमिटीचे अध्यक्ष आणि तेथील नागरीक यांचे मागणीनुसार प्रस्तावीत केलेली कब्रस्तानातील कामासाठीप्राप्त झालेल्या निविदानुसार सदर काम श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 4% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 260 :</u>**

**मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.वरखेडश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांनी दिनांक 01/12/2009 रोजी विनंती अर्ज देऊन महानगरपालिकेच्या मालकीचे मो.जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्बल मधील हॉल भाडे पट्ट्यावर मिळणेबाबत विनंती अर्ज**

केला आहे. सदर हॉलसाठी सिध्द शिघ्र गणकानुसार प्रति चौ.मी. प्रती माह रक्कम रू.209/- आकारण्यात आले होते. त्यानुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता.

सदर हॉलसाठी आकारलेले भाडे विषयी मा.स्थायी समिती सभा विषय क्र.447 दि.23/02/2010 प्रमाणे सभेत चर्चा होऊन ठराव झाला आहे की, जयहिंद कॉलनी या भागात आजुबाजुचे परिसरातील भाडे दरांचा विचार करून भाडे आकारणी करावी त्यानुसार तेथील आजुबाजुच्या परिसरातील त्या क्षेत्रफळासाठी उदा. 01) 112 चौ. मीटरसाठी प्रति माह रू.8500/- 02) 121 चौ.मीटरसाठी रू.9500/- 03) 95 चौ. मीटरसाठी रू.7200/- 04) 105 चौ. मीटरसाठी रू.8500 एवढे आहे. या सर्वांच्या तुलनात्मक भाड्याचा विचार करता 118.845 चौ. मीटरसाठी रू.78/- प्रति माह प्रती चौ. मीटरसाठी प्रमाणे मासिक भाडे रू.9,270/- येते. तसेच मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम व नियमानुसार अकृषीक कर व रू.05/- प्रति चौ. मी. प्रति माह सेवाशुल्क आकारून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेपट्ट्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.सुर्यकांत जायभाये : औरंगपूरा, सिटी मार्बल येथे जयहिंद कॉलनी येथील एक हॉल आहे. पाच सहा वर्षापासून रिकाम्या अवस्थेत आहे. स्थायी समितीमध्ये ठराव घेण्यात आलेला आहे. कमीत कमी भाडे तत्वावर हॉल देण्यास काही हरकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : गेल्या 5 वर्षापासून रिकाम्या अवस्थेत आहे. ठराव झालेला आहे. संबधीत संस्थेची मागणी आहे की, कमीत कमी भाडे आकारणी करून देण्यात यावे. शक्य ते भाडे कमी करून देण्यात यावे.

श्रीमती साधना सुरडकर : माझ्या वार्डातील तीन ते चार हॉल गेल्या 10 वर्षापासून महानगरपालिकेस एक रूपयाही उत्पन्न नाही. कुणीही हॉलचा वापर करीत आहे. दुरूस्तीही करण्यात आलेली नाही. त्यामुळे ज्या संबधीत संस्थेने मागणी केलेली आहे त्यांना हॉल भाडयाने देण्यात यावे. सदरील विषयावर गेल्या सहा महिण्यांपासून चर्चा करीत आहे. परंतु संचिकेला प्रतीसाद मिळत नाही. तरी ताबडतोब संचिका पाठविण्यात येऊन संस्थेला भाडयाने देण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.महेश माळवतकर व श्रीमती साधना सुरडकर यांनी जो विषय मांडलेला आहे. त्यासंदर्भात हॉल दुरूस्त करून भाडयाने देण्यात यावे जेणेकरून मनपाच्या उत्पन्नात भर पडणार आहे. मा.आयुक्तांनी संबधीत अधिकाऱ्यांना सूचना करून ते इस्टीमेट तयार करण्यास सांगण्यात यावे. स.सदस्य श्री. रेणुकादास वैद्य यांनी सांगीतल्याप्रमाणे जयहिंद कॉलनी येथील हॉल आणि एकनाथनगर येथील शॉप या संदर्भात जे कुणी संस्था येतील त्यांना कमीत कमी भाडे शक्य होईल ते करून भाडयाने देण्यात यावे.

श्रीमती साधना सुरडकर : रज्जुभय्या सभागृह.

मा.सभापती :कासलीवाल नगर, रज्जुभय्या सभागृह जे कुणी संस्था आली असेल त्यांना भाडयाने देण्यात यावे. त्याचप्रमाणे वरखेडश्वरी चॅरिटेबल ट्रस्ट

यांनी हॉलच्या भाडेबाबत मागणी केलेली आहे. मागणी केल्याप्रमाणे महानगरपालिकेचे 9,270/- रूपये येत असुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जे काही असेल ते कमी करून देण्यात यावे. रूपये 5000/- भाडयाने देण्यात आले तरीही चालेल. रामनगर एन 2 येथे बहुउद्देशिय संस्थेने मागणी केलेली आहे त्यांनासुध्दा एक हजार रूपये नाममात्र दराने भाडयाने देण्यात यावे. एकनाथनगरचे जे आणि 700 रूपये केलेले आहे ते 1000 रूपये करू.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.वरखेडश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मा.जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्बल मधील हॉल येथील भाडेपट्टयावर हॉलसाठी मा.स्थायी समिती सभा विषय क्रमांक 447 दिनांक 23.02.2010 प्रमाणे सभेत भाडेपट्टयाने देणे बाबत झालेल्या चर्चेनुसार जयहिंद कॉलनी या भागात आजूबाजूचे परसिरातील भाडे दरांचा विचार करून भाडे आकारणी करण्यास व त्यानुसार तुलनात्मक भाडयाचा विचार करता रू.9,270/-प्रतिमहा व प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अनामत रक्कम व अकृषीक कर तसेच रू.5/- प्रती चौरस मीटर प्रतीमाह सेवाशुल्क आकारून प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेपट्टयाने देणेस नियमानुसार मंजूरी देण्यात येते. तसेच भाडे कमी करून देता येत असेल तर त्याबाबतही योग्य ती कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 261 :</u>

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जिन्सी ते बायजीपुरा 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्ता महानगरपालिकेतर्फे विकसीत करण्यात येत असून नगर भुमापन क्रमांक 9261 ही मिळकत श्री.हिराचंद देवचंद कोळी तर्फे मुख्त्यारआम श्री.मो.अ.वाजेद सिद्दीकी यांची असून विकास योजना रस्त्यात 81.60 चौ.मी. क्षेत्र बाधीत होत आहे. सदर क्षेत्र भूखंडधारक हे खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेस देण्यास तयार आहेत.

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सदर रस्त्यात बाधीत मिळकती ताब्यात घेणे बद्दल निर्णय घेतला आहे. मोबदला धनादेशाद्वारे देण्यात येईल व खुल्या जागेचा दर र.रूपये 8,700/- चौ.मी. प्रमाणे देणे बद्दल आदेश आहे.

नगर भुमापन क्रमांक 9261 क्षेत्र 81.60 चौ.मी. बाधीत होत असून दर रूपये 8700/- चौ.मी. प्रमाणे र.रू.7,09,920/- सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे होत आहे. तरी र.रू.7,09,920/- च्या अर्जदाराच्या मागणीनुसार मा.आयुक्त महोदयांची मंजुरी प्राप्त आहे. तरी र.रू.7,09,920/- च्या मंजुरीसह प्रचलित पध्दतीप्रमाणे खरेदीखतासाठी होणारा खर्च भुखंडधारक व महानगरपालिका हे 50% - 50% एवढा करतात. त्यासाठी जो खर्च येईल त्यासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिन्सी ते बायजीपुरा 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्याने नगर भुमापन क्रमांक 9261 क्षेत्र 81.60 चौ.मी. बाधीत क्षेत्राचे खाजगी वाटाघाटीने सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे अर्जदार श्री.हिराचंद देवचंद कोळी तर्फे मुख्त्यारआम श्री.मो.अ.वाजेद सिद्दीकी यांना र.रू.7,09,920/- अदा करणेस व प्रचलित पध्दतीप्रमाणे खरेदीखतासाठी

भुखंडधारक व महानगरपालिका यांनी 50%-50% खर्च करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 262 :

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मंजुरीनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.अशोक पुंडलीक पाटील यांनी दि.03/09/2010 रोजी विनंती अर्ज देऊन महानगरपालिकेच्या मालकीचे उस्मानपुरा रेखाकंनातील न.भु.क्र.17338 लगत उर्वरीत 30 x 3 मीटर रूंद (90 चौ.मी. फक्त) गल्लीची जागा तीस वर्षासाठी लिजवर देण्याची मागणीची विनंती केली आहे. याबाबत नगर रचना विभागाने सदर जागा लिजवर देण्यास हरकत नाही, असे अभिप्राय मिळाले आहे. सदर खुल्या जागेसाठी सिध्द शिघ्र गणकानुसार रू.41/- प्रती चौ.मी. प्रतीमाहप्रमाणे मासीक भाडे रू.3690/- एवढे येते. मासीक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषी कर व इतर कर तसेच महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीनुसार लिजवर देणे बाबत प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे.

सदरील प्रस्ताव भाडे समितीच्या दर निश्चितीच्या अधीन राहुन सादर करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे उस्मानपुरा रेखाकंनातील न.भु.क्र.17338 लगत उर्वरीत 30 x 3 मीटर रूंद (90 चौ.मी. फक्त) गल्लीची जागा तीस वर्षासाठी लिजवर देण्याची श्री.अशोक पुंडलीक पाटील यांनी विनंती केल्यानुसार व नगर रचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे सदर खुल्या जागेसाठी रू.41/- प्रती चौ.मी. प्रतीमाह प्रमाणे मासीक भाडे रू.3690/- तसेच मासीक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषी कर व इतर कर तसेच महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीनुसार श्री.अशोक पुंडलीक पाटील यांना लिजवर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 263 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड-ड अंतर्गत विविध सखल भागात साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जि.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार र.रू.4,17,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास प्राप्त मंजुरीअंती निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 2 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 2.99% कमी दराने |
| 2. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 9.99% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन याची अं.प.दरापेक्षा 2.99% कमी दराची होती. परंतु सदर काम करतांना गणेशोत्सव व रमजान ईद हे मुख्य सण असल्यामुळे तसेच अतिवृष्टीमुळे शहरातील खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक होते. यासाठी सदर कामाच्या अंदाजपत्रकात व काही अतिरिक्त बाबींचा समावेश करणे अत्यंत आवश्यक असल्याने कामाच्या मुळे अंदाजपत्रकात रक्कम

रू.14,50,000/- ची वाढ झाली आहे. एकुण रक्कम रू.18,67,000/- या वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी सदर वाढी0 काम मुळ कामाचे गुत्तेदार मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून मुळ मंजुर दर म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2.99% कमी दरातच करून घेणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देऊन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेची शिफारस केली आहे.

तरी सदर वाढीव रक्कमेचे काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून मुळ मंजुर दर म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2.99% कमी दरातच करून घेणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ड अंतर्गत विविध सखल भागात साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे निविदानुसार आणि सदर काम करतांना गणेशोत्सव व रमजान ईद हे सण तसेच अतिवृष्टीमुळे शहरातील खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करणेसाठी सदर कामाच्या अंदाजपत्रकात व काही अतिरिक्त बाबींमुळे वाढीव रक्कमेचे काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून मुळ मंजुर दराने म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2.99% कमी दराने करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 264 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.25 एन-7 येथील जी-1 सेक्टर व शास्त्रीनगर मधील मोकळी जागा कुंपण भिंतीसह विकसीत करणे करीता सा.बां.विभागाचे सन 2010-11 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,94,250/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.स्थायी समितीने विषय क्र.184 दिनांक 14/03/2011 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता रत्नगुरू कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14% जास्त दराची एक निविदा दर भरून प्राप्त झ ालेली आहे. तथापी दराबाबतच्या वाटाघाटीअंती 14% दराऐवजी 12% जास्त दराच्या निविदेस मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुषंगाने रत्नगुरू कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14% जास्त दरा ऐवजी 12% जास्त दराचा निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 एन-7 येथील जी-1 सेक्टर व शास्त्रीनगर मधील मोकळी जागा कुंपन भिंतीसह विकसीत करणे करीता प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम रत्नगुरू कंस्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 265 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.25 एन-7 येथील बी-1 सेक्टर मधील मोकळी जागा कुंपन भिंतीसह विकसीत करणे करीता सा.बां.विभागाचे सन 2010-11 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,99,104/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.स्थायी समितीने विषय क्र.185 दिनांक 14/03/2011 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता रत्नगुरू कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14% जास्त दराची एक निविदा दर भरून प्राप्त झ ालेली आहे. तथापी दराबाबतच्या वाटाघाटीअंती 14% दराऐवजी 12% जास्त दराच्या निविदेस मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुषंगाने रत्नगुरू कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14% जास्त दरा ऐवजी 12% जास्त दराचा निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 एन-7 येथील बी-1 सेक्टर मधील मोकळी जागा कुंपण भिंतीसह विकसीत करणे करीता प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम रत्नगुरू कंस्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 266 :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09, मधील विशालनगर येथे सांस्कृतिक सभागृह/जिम्नॅशियम बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम 14,85,432/- होत आहे. नगररचना विभागाने मिळालेल्या नकाशावर 1357.15 चौ.मी. खुल्या जागेचे क्षेत्रफळ दर्शविण्यात आलेले आहे. खुल्या जागेच्या क्षेत्राच्या 10% क्षेत्र किंवा जास्तीत जास्त 200 चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम करता येईल. असा अभिप्राय नगर रचना विभागाने दिलेला आहे. तसेच नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यास न्यायालयीन प्रतिबंध नसल्याचे अभिप्राय मनपाचे विधी सल्लागार यांनी दिलेले आहे. सदर अभिप्रायानुसार प्रस्तावित बांधकामाचे अंदाजपत्रक र.रू.14,85,432/- यास मा.आयुक्त महोदयांनी मा.स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केल्यानुसार अंदाजपत्रक मान्यतेस्तव आणि व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षकामधुन सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात उपलब्ध असलेल्या तरतुदीनुसार खर्च भागविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.09, मधील विशालनगर येथे सांस्कृतिक सभागृह/ जिम्नॅशियम बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.14,85,432/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 267 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.82 अंतर्गत स्पंदननगर व पारीजात नगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.19,99,600/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. | अं.प.दरापेक्षा 1.08% दराने | कमी |

| | | |
|---|---|---|
| 2. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 7.55% जास्त दराने |
| 3. | मे. एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा 10% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांची असून अं.प.दरापेक्षा 1.08% कमी दराची निविदा आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांच्या अं.प.दरापेक्षा 1.08% कमी दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.82 अंतर्गत स्पंदननगर व पारीजात नगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.08% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 268 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.8 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.14,98,313/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 2 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. | अं.प.दरापेक्षा 1.04% कमी दराने |
| 2. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 7.55% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांची असून अं.प.दरापेक्षा 1.04% कमी दराची निविदा आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांच्या अं.प.दरापेक्षा 1.04% कमी दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.8 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.04% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 269 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मागासक्षेत्र विकास अनुदान निधी अंतर्गत रामनगर ते तेरावी योजना पर्यंतच्या 24 मी. रूंद रस्त्याच्या खराब भागाचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.19,97,300/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 4 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. | अं.प.दरापेक्षा 1.78% कमी दराने |
| 2. | मे.एम.ए.सिद्यीकी | अंदाजपत्रकीय दराने |
| 3. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 1.1% जास्त दराने |
| 4. | श्री.मस्कट कंपनी | अं.प.दरापेक्षा 3.00% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांची असून अं.प.दरापेक्षा 1.78% कमी दराची निविदा आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांच्या अं.प.दरापेक्षा 1.78% कमी दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागासक्षेत्र विकास अनुदान निधी अंतर्गत रामनगर ते तेरावी योजना पर्यंतच्या 24 मी. रूंद रस्त्याच्या खराब भागाचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.78% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 270 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.59 अंतर्गत डॉ.पी.एस.पाटील दवाखाना ते खोकडपुरा रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.14,85,600/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा 5.92% जास्त दराने |
| 2. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 9.21% जास्त दराने |

3. श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. अं.प.दरापेक्षा 12% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.एम.ए.सिद्मीकी यांची असून अं.प.दरापेक्षा 5.92% जास्त दराची निविदा आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदर कामाच्या निविदेस अंदाजपत्रकीय दराने मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.एम.ए.सिद्मीकी यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.59 अंतर्गत डॉ.पी.एस.पाटील दवाखाना ते खोकडपुरा रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.एम.ए.सिद्मीकी यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 271 :</u>

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.68 सिंधी कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.14,85,483/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 8.55% जास्त दराने |
| 2. | श्री.ए.सी.कोठारी इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅ. | अं.प.दरापेक्षा24.77% जास्त दराने |
| 3. | मे. एम. ए. सिद्मीकी | अं.प.दरापेक्षा 27.00% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून अं.प.दरापेक्षा 8.55% जास्त दराची निविदा आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या अं.प.दरापेक्षा 8.55% जास्त दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.68 सिंधी कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 8.55% जास्त दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 272 :**

**मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पैठणगेट येथील वाहनतळ शुल्क वसुली ठेका पध्दतीने सन 2010-11 करीता ठेका देण्यासाठी दिनांक 10/06/2010, 21/09/2010, 05/10/2010, 07/12/2010 अन्वये चार वेळेस प्रसिध्दी देण्यात आली होती. परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे संबंधीत ठेकेदार जानेवारी 2011 ते 31/03/2011 पर्यंतच्या कालावधीसाठी रक्कम रू.10,500/- प्रति माह प्रमाणे ठेका देण्यात आला होता. सदरील ठेक्याची मुदत संपलेली असून सन 2011-12 या कालावधीसाठी अर्जदार श्री.दिपक सु. मुंडले यांनी रक्कम रू.15,000/- प्रति माह प्रमाणे देण्याची तयारी दर्शविलेली आहे. सदरील रक्कम ही मागील वर्षाच्या दरापेक्षा जास्त आहे. प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे.**

**करीता पैठणगेट येथील वाहनतळ शुल्क वसुलीसाठी दिनांक 01/04/2011 ते 31/03/2012 या कालावधीसाठी देण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव तथा सविनय विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पैठणगेट येथील वाहनतळ शुल्क वसुलीचा ठेका घेण्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे जानेवारी 2011 ते 31/03/2011 पर्यंतच्या कालावधीसाठी रक्कम रू.10,500/- प्रति माह प्रमाणे ठेका घेतलेले ठेकेदार श्री.दिपक सु. मुंडले यांनी सन 2011-12 या कालावधीसाठी रक्कम रू.15,000/- प्रति माह प्रमाणे देण्याची तयारी दर्शविलेली असल्याने उपरोक्त कालावधीसाठी त्यांना रक्कम रू.15,000/- प्रति माह प्रमाणे वाहनतळ शुल्क वसुलीचा ठेका देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 273 :**

**मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मंजुरीनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक 25/04/2011 रोजी पत्रान्वये मो.एन-6, सिडको येथील आकाश हॉल भाडे तत्वावर मिळणे बाबत कळविले आहे. महानगरपालिकेच्या मालकीचे आकाश हॉल भाडे तत्वावर देण्यासाठी सिध्द शिघ्र गणकानुसार आर.सी.सी. बांधीव क्षेत्रासाठीचे दर रू.171/- प्रति चौ.मी. प्रती माह प्रमाणे एकुण क्षेत्रफळ 304.12 चौ.मी. चे मासीक भाडे रू.52,005/- एवढे येते. तसेच खुल्या जागेसाठीचे एकुण क्षेत्रफळ 184.76 चौ.मी. साठी सिध्द शिघ्र गणकानुसार रू.50/- चौ.मी. प्रती माह प्रमाणे मासीक भाड्याच्या रू.9238/- अशी एकुण रक्कम रू.61,243/- तसेच मासीक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कर व इतर कर तसेच महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीनुसार भाड्याने देणे बाबत प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे.**

सदरील प्रस्ताव भाडे समितीच्या सदर निश्चितीच्या अधीन राहुन सादर करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी एन-6, सिडको येथील आकाश हॉल भाडे तत्वावर मिळणे बाबत विनंती केल्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीचे आकाश हॉल भाडे तत्वावर देण्यासाठी सिध्द शिघ्र गणकानुसार आर.सी.सी. बांधीव क्षेत्रासाठी मासीक भाडे रू.52,005/-व खुल्या जागेसाठीचे मासीक भाडे रू.9238/-अशी एकुण र.रू.61,243/-तसेच मासीक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम,सेवाशुल्क,अकृषीककर व इतरकर तसेच महापालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीनुसार भाड्याने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 274 :

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1,2 व 3 इमारती व परिसरातील देखभाल दुरूस्तीची कामे करणेसाठी सन 2010-2011 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अ.प. र.रू.19,90,203/- होत आहे. सदर कामामध्ये वर्षभरात करावयाची देखभाल दुरूस्तीची आणि इतर महत्वाची व तातडीची कामे करण्याच्या आवश्यक त्या अंदाजीत बाबींचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप करावयाच्या कामासाठी आवश्यक त्या अटी व शर्ती नमुद करून अंदाजपत्रक मान्यतेअंती अल्पमुदतीची निविदा बोलावणेस आणि अ.प. रक्कम रू.19,90,203/- मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1,2 व 3 इमारती व परिसरातील देखभाल दुरूस्तीची कामे करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.19,90,203/- च्या अंदाजपत्रकास व प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप करावयाच्या कामासाठी आवश्यक त्या अटी व शर्ती नमुद करून अल्पमुदतीची निविदा बोलावणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 275 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र.38 अंतर्गत बंजारा कॉलनी मधील गटार दुरूस्त करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2009-10 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.18,83,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडुन प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. श्री.संतोष चव्हाण अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.81% कमी दराने
2. श्री.शेख सलिम मोईनोद्दीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.786% कमी दराने
3. मे.अमन असोसियट अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.संतोष चव्हाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.81% कमी दराची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.संतोष चव्हाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.81% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.38 अंतर्गत बंजारा कॉलनी मधील गटार दुरूस्त करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.81% कमी दराची श्री.संतोष चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 276 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.15 सिडको एन-12 येथील धन्नुलाल मेघावाले मनपा सभागृह व मनपा शाळा दरम्यान भिंत बांधणे करीता सा.बां. विभागाचे सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.9,99,932/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुषंगाने ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता सदरील कामासाठी श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21% जास्त दराची 1 निविदा दर भरून प्राप्त झाली असून दराबाबतच्या वाटाघाटीअंती सन 2008-09 व सन 2010-11 च्या सा.बां. विभागाच्या जिल्हा दरसुचीची तुलना केली असता 18% जास्तीचे दर येत आहेत. त्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21% जास्त दराऐवजी 18% जास्त दराने सदरील निविदा प्रस्तावास मा.आयुक्त महोदय यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाची श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21% जास्त दराऐवजी 18% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.15 सिडको एन-12 येथील धन्नुलाल मेघावाले मनपा सभागृह व मनपा शाळा दरम्यान भिंत बांधणे करीता प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 277 :

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09, अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन 2010-11 ची दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून अ.प. र.रू.12,99,169/- यास मा.स्थायी समिती सभा दिनांक 21/12/2011 रोजी विषय क्र.161 अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1. मे.ड्रीमलँड कंस्ट्रक्शन 24% जास्त
2. कालीका इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स 30% जास्त.

मे.ड्रिमलँड कंस्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आणि अ.प. पेक्षा 24% जास्त असल्यामुळे त्यांना अ.प. दराने काम करण्यास विचारणा करण्यात आली असता त्यांनी संमती दर्शविल्यानुसार अंदाजपत्रकीय दरास मा.आयुक्त यांची दिनांक 29/04/2011 रोजी मान्यता

प्राप्त आहे. तरी मे.ड्रीमलँड कंस्ट्रक्शन, यांची अंदाजपत्रकीय दराच्या निविदा दरास मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.09, अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 24% जास्त दराचे निविदाधारक मे.ड्रिमलँड कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम मे.ड्रिमलँड कंस्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 278 :

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.29 अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याचा सन 2010-11 च्या दरसुचिनुसार अ.प. र.रू.14,99,666/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात करण्यात येईल, सदर अंदाजपत्रक मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होवून मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तरी अ.प. र.रू.14,99,666/- चे अ.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.29 अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.14,99,666/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 279 :

कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.81, 13 वी योजना जयभवानीनगर येथील सिडको विभागात रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचिनुसार रक्कम रूपये 9,98,652/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च शहरी भागात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकुण (चार) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

1. मे.अरोरा कंस्ट्रक्शन 42.12% जास्त दराने.
2. मे.मॉस्कॉट कंस्ट्रक्शन 45% जास्त दराने.
3. श्री.एम.ए.सिद्दीकी 45.12% जास्त दराने.
4. मे.राजेश्वर कंस्ट्रक्शन 46% जास्त दराने.

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजेच सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 42.12% जास्त दराची मे.अरोरा कंस्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे. प्रस्तावित अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार तयार करण्यात आले आहे. संबंधीत गुत्तेदाराने सन 2010-11 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार दरवाढीचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. त्यानुसार सन 2008-09 च्या दरसुचीमध्ये सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात 18.74% एवढी वाढ झालेली आहे. अं. प. दरापेक्षा 18.74% जास्त दराने

निविदा मंजुर केल्यास, सदर दर हा 2010-11 च्या दरसुचीनुसार अं.प. दराने येतो. या कामावर र.रू.11,45,749/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. अं.प. दरापेक्षा 18.74% जास्त दरास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी अं. प. दरापेक्षा 18.74% जास्त दराने मे.अरोरा कंस्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.81, 13 वी योजना जयभवानीनगर येथील सिडको विभागात रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.74% जास्त दराची मे.अरोरा कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 280 :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद शहर व जिल्हासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंतर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्हासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केल्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/ डी.एम.-1 दि.25/07/06 नुसार सेवा पुरवावी लागणार आहे. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक, जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06/12/2008 नुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे पुरवठा करण्यात आलेल्या एक टाटा 1613 एल.पी.टी. चेसीसवर रेस्क्यु व्हॅन फॅब्रीकेट करणे व त्याबरोबर लागणाऱ्या सर्व अक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी करून देणेसाठी प्रस्तावित आहे.

अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबादसाठी फायर टेंडरचे चेसीस (चार नग) टाटा एल.पी.टी.1613/42 सी.एम.व्ही.आर. कॉन- ईरो-2 चेसेस खरेदी केलेले आहेत. सदरील खरेदी ही 12 वा वित्त आयोगाच्या अनुदानातुन खरेदी केलेली आहे. यासाठी सर्वसाधारण सभेने ठराव क्र.418 दिनांक 12/02/2009 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. विभागाने चार चेसेस खरेदी केलेले असून त्यापैकी एक चेसेसवर रेस्क्यु व्हॅन फॅब्रिकेशन करावयाचे आहेत. अंदाजपत्रकीय दर रूपये 2,27,87,298/-

जाहीर निविदा सूचना (दुसरी वेळ) राज्य/राष्ट्रीय स्तरावरील वर्तमान पत्र दैनिक टाईम्स ऑफ इंडिया नवी दिल्ली, दैनिक लोकसत्ता मुंबई, दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई, दैनिक सामना मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद तसेच ई-टेंडर मार्फत दर मागविण्यात आलेले आहेत. याबाबत मे.ब्रिजवासी हायटेक उद्योग प्रा.लि. यांची एकमेव निविदा प्राप्त झ ालेली आहे. यामध्ये निविदा दर रूपये 2,51,47,514/- (अक्षरी दोन कोटी एकावन्न लाख सत्तेचाळीस हजार पाचशे चौदा रूपये फक्त) असे आहेत. अंदाजपत्रकीय दरापेक्षा निविदा दर हे 10.35 टक्के जास्तीचे दर आहेत.

मा.आयुक्त यांच्या दालनातील आयोजीत बैठकीत मा.मुख्यलेखाधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी व मे.ब्रिजवासी हायटेक उद्योग प्रा.लि. तर्फे श्री.आर.बी. शाह यांच्या चर्चेनुसार जाहीर निविदेतील आलेल्या दरास कमी करून रूपये 2,48,00,000/- (अक्षरी दोन

कोटी अठ्ठेचाळीस लाख रूपये फक्त) या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर व जिल्हासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रांतर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्हासाठी आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन शासन निर्णयानुसार सेवा पुरवावी लागणार असून आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे पुरवठा करण्यात आलेल्या एक टाटा 1613 एल.पी.टी. चेसीसवर रेस्क्यु व्हॅन फॅब्रीकेट करणे व त्याबरोबर लागणाऱ्या सर्व अक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी करून देणेसाठी त्याचप्रमाणे अग्निशमन विभागासाठी खरेदी केलेल्या फायर टेंडरचे चार चेसेस पैकी एक चेसेसवर रेस्क्यु व्हॅन फॅब्रिकेशन करण्याचे कामासाठी प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून निविदा दर रूपये 2,51,47,514/- ऐवजी रक्कम रूपये 2,48,00,000/- (अक्षरी दोन कोटी अठ्ठेचाळीस लाख रूपये फक्त) या दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रं. 281 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-1, सिडको येथे पोलीस चौकीच्या शेजारी व पोलीस चौकीच्या समोर मनपाची खुली जागा आहे. या मोकळया जागांवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आर.के.कॉन्स्ट्रो प्रोजेक्टस् प्रा.लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा संचालक, यांनी पत्र देवून विनंती केली आहे की, एन-1, सिडको येथे पोलीस चौकीजवळील दोन खुल्या जागांवर उद्यान विकसीत करणेची परवानगी द्यावी. यासाठी लागणारा खर्च ते स्वत: करणार असून 10 वर्षे उद्यानाची देखभाल करणार आहेत. कंपनीने विकसीत केलेल्या उद्यानात कंपनीच्या नांवाचे फलक लावण्यात येतील.

खुल्या जागेचे संरक्षणाबरोबरच उद्यानामुळे सुशोभीकरण होणार आहे. करीता वर दर्शविलेल्या खुल्या जागा व इतर ठिकाणच्या रोडसाईड ओपन स्पेस आर.के.कॉन्स्ट्रो प्रोजेक्टस् प्रा.लि. या कंपनीस स्वखर्चाने उद्यान विकसीत करण्यासाठी व 10 वर्षापर्यंत देखभाल दुरूस्तीही स्वखर्चाने करणार या अटीवर देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : सौ.साधना सुरडकर

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-1, सिडको येथे पोलीस चौकीच्या जवळील मनपाच्या मालकीच्या खुल्या जागावर अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याने व आर.के. कॉन्स्ट्रो प्रोजेक्टस् प्रा.लि. यांनी विनंती केल्यानुसार या ठिकाणी स्वखर्चाने उद्यान विकसीत करणेस व कंपनीने विकसीत केलेल्या उद्यानात कंपनीच्या नांवाचे फलक लावण्यासाठी परवानगी देण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच इतर ठिकाणच्या रोडसाईड ओपन स्पेस स्वखर्चाने सुशोभिकरण व संवर्धन करण्यासाठी 10 वर्षापर्यंत देखभाल दुरूस्ती करण्याच्या अटीवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 282 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाकडुन राबविण्यात येत असलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरनिर्माण अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने

राज्यातील नागरी भागामध्ये होत असलेली लोकसंख्येची वाढ व नागरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता नागरी भागांच्या दिर्घकालीन गरजांचा विचार करून शहरी भागाचा नियोजनबध्द व सुनियोजीत विकास होण्याकरीता सर्वसमावेशक अभियान राबविणेसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-2008/प्र.क्रं.203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत केलेली आहे.

औरंगाबाद शहर हे विभागीय मुख्यालयाचे ठिकाण असल्या कारणाने तेथील स्थानिक स्वराज्य संस्थाना या योजनेअंतर्गत प्रथम प्राधान्य असल्याने औरंगाबाद शहराची निवड प्राधान्यक्रम देवुन केली गेलेली आहे.

सदरील महाअभियानात सहभागी होण्याचा व वरीलप्रमाणे 50% अनुदान व 50% कर्ज घेणेबाबत तसेच अभियाना अंतर्गत आवश्यक असलेले करारनामे करणे व मान्यता घेणे, या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी जे जे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस व शासनाकडे पाठविणेस महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला असता मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20/02/2010 च्या ठराव क्रं.1005 नुसार महाअभियान संदर्भाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणेबाबत महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता दिलेली आहे.

मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेन्वये तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदरील महाअभियानात सहभागी होण्याच्यादृष्टीने औरंगाबाद शहरातील विविध विकास कामांचे प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सादर करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने कामाची निकड लक्षात घेता औरंगाबाद शहरात (1) ऐतिहासीक नौबत दरवाज्याचे जतन व संवर्धन आणि अनुषंगिक कामे करणे. (2) डॉ.सलीमअली सरोवराचे संवर्धन व जतन करणे याचे विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) मे.एस. बी. एस. असोशिएटस, औरंगाबाद या स्थानिक कंन्सल्टंसी कडुन तयार करून घेण्यात आलेला होता.

सदरील विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) मा.सचिव, नगर विकास विभाग, मुंबई यांचेकडे पत्र क्रं./मनपा/मआ/स्वीस/91 दिनांक 22/02/2010 नुसार पाठविण्यात आलेला असुन या विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) बाबत शासनाने कोणतीही दुरूस्ती सुचविलेली नाही.

सदरील विस्तृत प्रकल्प अहवालास जा.क्र./मनपा/शअ/111/2010 दिनांक 10/05/2010 नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सुचनेतील सर्व अटी व शर्तीसह तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीसह शासनाकडुन मंजुरी आणणे आवश्यक असल्याने एकुण प्रकल्प रक्कमेच्या 1.50% या दराने मे.एस.बी.एस.असोशिएटस यांच्याकडुन शासन मंजुरीचे काम करून घेण्यास व याबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे.

करीता उपरोक्त नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद शहरात (1) ऐतिहासीक नौबत दरवाज्याचे जतन व संवर्धन आणि अनुषंगिक कामे करणे. (2) डॉ.सलीमअली सरोवराचे संवर्धन व जतन करणे या कामाबाबतचा शासनास वरील नुसार सादर करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवालास (DPR) जा.क्र./मनपा/शअ/111/2010 दि.10/05/2010 नुसारच्या निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीसह शासनाच्या संबंधीत प्राधिकरणा/यंत्रणेकडुन मंजुरी प्राप्त करून आणणे तसेच कामाची निविदा तयार करणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे व त्याबाबत अहवाल सादर करणे इत्यादी कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.एस.बी.एस.असोशिएटस यांची नियुक्ती करण्यास व एकुण प्रकल्प

रक्कमेच्या 1.50% दराने कन्सल्टन्सी फी देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद शहरात (1) ऐतिहासीक नौबत दरवाज्याचे जतन व संवर्धन आणि अनुषंगिक कामे करणे. (2) डॉ.सलीम अली सरोवराचे संवर्धन व जतन करणे या कामाबाबतचा शासनास सादर करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवालास (DPR) जा.क्र./मनपा/शअ/111/2010 दि.10/05/2010 नुसारच्या निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीसह शासनाच्या संबंधीत प्राधिकरणा/यंत्रणेकडुन मंजुरी प्राप्त करून आणणे तसेच कामाची निविदा तयार करणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे व त्याबाबत अहवाल सादर करणे इत्यादी कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.एस.बी.एस.असोशिएटस यांना एकुण प्रकल्प रक्कमेच्या 1.50% दराने कंसल्टन्सी फी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 283 :

कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराच्या ज्या भागात जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा होत नाही किंवा नळाद्वारे पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर खाजगी टँकर लावण्यात आलेले होते. या कामासाठी एक वर्षात सर्वसाधारणपणे रक्कम रू.43.07 लक्ष खर्च होईल असे अपेक्षित धरून निविदा कार्यवाही करण्यात आलेली आहे. स्थायी समिती ठराव क्र.133 दिनांक 31/8/2009 प्रमाणे मे.सचिन वॉटर सप्लायर्स औरंगाबाद यांचे तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेल्या दरास व वार्षिक करार करणेस मान्यता प्राप्त आहेत. मंजुर दर खालीलप्रमाणे आहे.

| ठेकेदार | टँकर क्षमता | मंजुर दर | |
|---|---|---|---|
| | | प्रति दिन रूपये | प्रति कि.मी. रूपये |
| मे.सचिन वॉटर सप्लायर्स औरंगाबाद | 5000 लि.<br>10000 लि. | 800/-<br>1300/- | 11.75<br>15.00 |

वर्ष 2010 च्या उन्हाळयामध्ये शहरास पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत नसल्यामुळे टँकरची मागणीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती तसेच वर्ष 2010-2011 या वर्षाकरीता निविदा मागवुन दर निश्चित करणे व वार्षिक करार करणेसाठी विलंब झाल्यामुळे मे.सचिन वॉटर सप्लायर्स औरंगाबाद यांचेकडुन मंजुर दराप्रमाणे दिनांक 23/02/2011 पर्यंत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम करून घेण्यात आले आहे.

सदरील कामासाठी रू.43.07 लक्षच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता प्राप्त आहे. तथापी 2010 च्या उन्हाळयातील जास्तीच्या टँकरमुळे व या कामासाठीच्या वाढीव कालावधीमुळे प्रत्यक्षात रू.1,05,13,299/- खर्च झालेला आहे. भाडेतत्वावरील खाजगी टँकर करीता झालेल्या वाढीव खर्चास सुधारीत प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करून मान्यता घेणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केली आहे.

तरी मे.सचिन वॉटर सप्लायर्स,औरंगाबाद यांचेकडुन टँकरद्वारे पाणी पुरवठ्याच्या कामास व प्रत्यक्ष झालेल्या एकुण र.रू.1,05,13,299/- च्या खर्चाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराच्या ज्या भागात जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा होत नाही किंवा नळाद्वारे पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही, अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर लावण्यात आलेले खाजगी टँकर स्थायी समिती ठराव क्र.133 दिनांक 31/8/2009 प्रमाणे मंजुर दरानुसार मे.सचिन वॉटर सप्लायर्स औरंगाबाद यांचेकडुन दिनांक 23/02/2011 पर्यंत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम करून घेण्यात आले असल्यामुळे, टँकरद्वारे पाणी पुरवठ्याच्या कामास व प्रत्यक्ष झ ालेल्या एकुण रक्कम रू.1,05,13,299/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 284 :

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहेत की, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.आरसीएच-2009/प्र.क्रा/(28/09) आरोग्य 7-ब, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 2 मार्च 2009 नुसार नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब गरजु महिलांची प्रसुती संस्थेत करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना लागु करण्यात आलेली होती. शासनाच्या मंजुरीनुसार व आरसीएच-2 माध्यमातून सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.

नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील झोपडपट्टी व अनाधिकृत वस्तीमध्ये अजुनही मोठ्या प्रमाणात प्रसुती घरी होतात व यामुळे अशा ठिकाणी मातामृत्यु व बालमृत्यु दर जास्त आहे. शहरामध्ये शासकीय आरोग्य संस्था/रूग्णालये कार्यरत आहेत. परंतु तेथील रूग्णांची संख्या व सेवा शुल्क जास्त असते. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांना आरोग्य सेवेचा लाभ घेणे शक्य होत नाही. नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब गरजु महिलांची प्रसुती आरोग्य संस्थेत करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना लागु करण्यात आली आहे.

सदरील योजनेत खाजगी वैद्यकीय व्यावसायिक (स्त्रीरोगतज्ञ) यांच्या संस्थेत मोफत बाळांतपणाची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या सेवेसाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना प्रति बाळांतपण रू.1700/- मानधन देण्यात येते. सदरील मानधन सर्व प्रकारच्या बाळांतपणासाठी लागू आहे. (नैसर्गिक/सिझेरियन/अतिजोखमीच्या माता)

शासनातर्फे आरसीएच-2 च्या माध्यमातून या योजनेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सन 2009-10 व सन 2010-2011 यावर्षात पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना राबविण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील खालील 4 खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना नामांकित करण्यात आलेले आहे. (स्त्रीरोगतज्ञ संघटनेने कळविल्यानुसार)

1. साकोळकर चॅरिटेबल हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर, औरंगाबाद
2. डॉ.कराड मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर, औरंगाबाद
3. डॉ.जिल्ला हॉस्पीटल, औरंगाबाद
4. वासल्य नर्सिंग होम, औरंगाबाद

आतापर्यंत एकुण शहरातील 648 गरीब गरजु लाभार्थींना लाभ देण्यात आलेला आहे. परंतु शासनाने दिनांक 02/04/2011 च्या पत्रानुसार सदरील योजनेस स्थगिती दिलेली आहे. ही योजना माता-मृत्यु व बाल मृत्यु रोखण्यासाठी उपयुक्त आहे. त्यास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता ही योजना महानगरपालिकेच्यावतीने सुरू ठेवणे योग्य आहे. मा.महापौर यांच्या दिनांक

**27/04/2011 रोजी पत्रानुसार सदर योजनेसाठी सन 2011-12 च्या अर्थसंकल्पात रू.20 लक्ष अनुदानाची तरतुद करण्यात आलेली आहे.**

**वरील नामाकिंत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकाकडे बाळांतपणाची सोय मोफत उपलब्ध करून देण्याच्या व याकरीता खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना रू.1700/- प्रति बाळांतपण याप्रमाणे मानधन अदाई करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब गरजू महिलांची प्रसूती आरोग्य संस्थेत करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना व आरसीएच-2 माध्यमातून राबविण्यात आलेली योजना माता-मृत्यू व बाल मृत्यू रोखण्यासाठी उपयुक्त असल्याचे प्रस्तावित केल्यानुसार ही योजना महानगरपालिकेच्या वतीने सुरू ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. आतापर्यंत शहरातील एकूण 648 गरजू लाभार्थींना लाभ देण्यात आलेला असल्याने प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या अ.क्र. 01 ते 04 या नामांकित खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना प्रतिबाळांतपण रू.1700/- प्रमाणे मानधन अर्थसंकल्पातील तरतुदीस अधिन राहुन अदाई करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 285 :</u>**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.72 अंतर्गत कासलीवाल कॉर्नर ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापर्यंत 350 मी.मी. व्यासाची डी.आय.के-7 जलवाहीनी टाकणे त्यासाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2009-10 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.12,94,865/- एवढ्याचे तयार करण्यात आले. या कामाचा खर्च भांडवली कामे (वार्ड-ई) पाणी पुरवठा या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार आहे.**

**करिता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.12,94,865/- चे मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.72 अंतर्गत कासलीवाल कॉर्नर ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापर्यंत 350 मी.मी. व्यासाची डी.आय.के-7 जलवाहीनी टाकणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.12,94,865/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 286 :</u>**

**कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.24 पावरलुम, एमआयडीसी, चिकलठाणा येथील उर्वरीत नाला भागास आरसीसी नाला संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2010-2011 च्या दरसूची नुसार रक्कम रू.18,85,200/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च सन 2010-2011 या आर्थिक वर्षात मा.स्थायी समिती सभापती आपत्कालीन निधीमधून करण्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे आणि मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रूपये 18,85,200/- चे मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.24 पावरलुम, एमआयडीसी, चिकलठाणा येथील उर्वरीत नाला भागास आरसीसी नाला संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी तयार करण्यात**

**आलेल्या रक्कम रूपये 18,85,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 287 :**

**कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.90 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,98,500/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एक निविदा विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील एक निविदा दर भरून प्राप्त झाली असुन त्याचे दर खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | 22.12% जास्त दर |

**वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.12% जास्त असे आहेत. सदरील कामाचे दर हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार असल्याने त्याची तुलना सन 2010-11 च्या दरसुचीनुसार केल्यास सदरील दर 3.86 टक्के कमी असे येतात.**

**तरी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.12% जास्त दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.90 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेली मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 22.12% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 288 :**

**कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.24 सेक्टर-सी व सेक्टर-ई लगतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,400/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (3) तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची दराची निविदा मे.कालीका इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांची असुन ती अ.प.दरापेक्षा 18% जास्त दराची आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांचेकडुन मान्यता होऊन मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तथापी मे.कालीका इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांची उपरोक्त कामाची अ.प. दरापेक्षा 18% जास्त दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.24 सेक्टर-सी व सेक्टर-ई लगतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 18% जास्त दराची दराची मे.कालीका इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 289 :**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समिती सभा दि.30/8/2010 अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एनयुआर-2008/प्र.क्र.203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 नुसार औरंगाबाद शहरातील**

मलनिःसारण व्यवस्था सुधारणा करणे, औरंगाबाद शहरातील गुंठेवारी अंतर्गत येणाऱ्या वसाहती मध्ये नागरी सुविधा पुरविणे तसेच औरंगाबाद शहरातील नैसर्गिक नाला प्रवाहाच्या दोन्ही बाजुने भिंत बांधुन नाला ट्रेनिंग करणे बाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे संदर्भाने रितसर निविदा कार्यवाही अंती मे.फोट्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांची नेमणुक करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता मा.स्थायी समितीने अनुक्रमे ठराव क्र.37, 38 व 39 दिनांक 30/8/2010 नुसार ठराव मंजुर करून सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी संबंधीत एजन्सीला बोलावून त्यांचेशी वाटाघाटी करून योग्य वाटल्यास पुन्हा चर्चा करून शक्य होईल तेवढ्या कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घेण्यास आणि शासनाकडून निधी आल्यानंतर त्यातून त्यांचे देयक अदा करण्यास व सभागृहात दिलेल्या सुचना प्रमाणे कार्यवाही करणे इत्यादी दुरूस्तीसह प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

तदनुसार मा.आयुक्त यांनी मे. मे.फोट्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांचे प्रतिनिधी सोबत दिनांक 30/9/2010 रोजी फेर वाटाघाटी करून ठराव क्र.37 व 38 च्या कामासाठी 2.35% + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त ऐवजी 2.25% + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त अश्या निविदा दरास तसेच ठराव क्र.39 च्या 2.00% + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त ऐवजी 1.95% + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त अश्या निविदा दरास मंजुरी दिलेली आहे.

परंतु शासनास वरील तीनही कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) विहित कालमर्यादेत पाठविणे असल्याने यासाठी संबंधीत संस्थेला त्यांना निविदेतील अटी व शर्तीनुसार देय असलेल्या एकुण प्रकल्प फी च्या 5 टक्के नुसारचे देयक विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सादर केल्यानंतर देणे आवश्यक आहे.

करीता मा.स्थायी समितीने ठराव क्र.37, 38 व 39 नुसार केलेल्या सुचना प्रमाणे कलेल्या कार्यवाहीचा अहवाल अवलोकनास्तव तसेच शासनास वरील तीनही कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) विहीत कालमर्यादेत पाठविणे असल्याने यासाठी संबंधीत संस्थेला निविदेतील अटी व शर्तीनुसार त्यांना देय असलेल्या एकुण प्रकल्प फी च्या 5 टक्के नुसारचे देयक विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून शासनास सादर केल्यानंतर देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एनयुआर-2008/प्र.क्र.203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 नुसार औरंगाबाद शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणा करणे, औरंगाबाद शहरातील गुंठेवारी अंतर्गत येणाऱ्या वसाहती मध्ये नागरी सुविधा पुरविणे तसेच औरंगाबाद शहरातील नैसर्गिक नाला प्रवाहाच्या दोन्ही बाजुने भिंत बांधुन नाला ट्रेनिंग करणे बाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे संबंधी स्थायी समिती सभेतील ठराव क्र.37, 38 व 39 दिनांक 30/8/2010 नुसार शासनास वरील तीनही कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) विहीत कालमर्यादेत पाठविणे आवश्यक असल्याने संबंधीत संस्थेला निविदेतील अटी व शर्तीनुसार त्यांना देय असलेल्या एकुण प्रकल्प फी च्या 5 टक्के नुसारचे देयक विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून शासनास सादर केल्यानंतर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 290 :</u>

कार्यकारी अभियंता, वार्ड इ व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव ट्रेंचिग ग्राऊंड येथे आदमासे 30 वर्षे कालावधीपासून औरंगाबाद शहरातील घनकचऱ्याचे साठवणुक

डेपो असुन सदर कचरा आदमासे 44 एकर एवढ्या विस्तीर्ण क्षेत्रात ढिगार स्वरूपात पसरलेला आहे. सदर घनकचऱ्याचे प्रादुर्भावाने परिसरात पाऊस काळा दरम्यान पसरणाऱ्या रोगराई, दुर्गंधी व अनहैजेनिक परिस्थिती या सर्व बाबीला आळा घालण्यासाठी तसेच औरंगाबाद येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विमानतळापासुन विहीत अंतरात कचरा डेपोमुळे येणाऱ्या पक्षांच्या अडथळ्यांपासुन सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहुन सदर घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे गरजेचे होते. त्यादृष्टीने महानगरपालिकेकडुन नारेगांव ट्रेंचिग ग्रांऊड येथील 8.00 एकर आणि 2.00 एकर अशा दोन टप्प्यात इंजिनिअर्ड सॅनीटरी लँडफिल क्षेत्र विकासाचे काम एप्रिल 2010 मध्ये पुर्ण करण्यात आलेले आहे.

सदर ट्रेंचेसमध्ये कुजणाऱ्या कचऱ्यातुन निघणारा वायु व्हेंट पाईपद्वारे वातावरणात सोडण्यात येतो. सदर वायु एकत्रित जमा करून व पुढील कलेक्शन व रिफिलींग करण्याचे काम हाती घेतल्यास सदर वातावरणात मिसळुन वाया जाणारा वायु पासुन उत्पन्न मिळणे संभवते. कार्बन क्रेडीट मिळण्याचे काम हाती घेण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी प्रकल्प सल्लागार नेमुन प्रकल्पाचे आराखडे तयार करणे आवश्यक आहे. तथापी दिनांक 18/10/2005 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक 86, अन्वये अंदाजपत्रकीय रकमेच्या 1.5% एवढ्या मोबदला स्वरूपाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) नियुक्त करणेस ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

करीता लँडफिल प्रकल्पापासुन कार्बन क्रेडीट मिळविणेसाठीचे प्रकल्प आराखडे व पुढील कार्यवाही करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.दरशॉ ॲन्ड कंपनी प्रा.लि.मुंबई यांची अंदाजपत्रकीय रकमेच्या 1.5% (दिड टक्का) एवढी रक्कम मोबदला स्वरूपात देणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव ट्रेंचिग ग्राऊंड येथील ट्रेंचेसमध्ये कुजणाऱ्या कचऱ्यातुन निघणारा वायु व्हेंट पाईपद्वारे वातावरणात सोडण्यात येणारा वायु एकत्रित जमा करून व पुढील कलेक्शन व रिफिलींग करण्याचे काम हाती घेण्याचे दृष्टीने, लँडफिल प्रकल्पापासुन कार्बन क्रेडीट मिळविणेसाठीचे प्रकल्प आराखडे व पुढील कार्यवाही करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.दरशॉ ॲन्ड कंपनी प्रा.लि.मुंबई यांची अंदाजपत्रकीय रकमेच्या 1.5% (दिड टक्का) एवढी रक्कम मोबदला स्वरूपात देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. २९१ :</u>

श्री.रविंद्र निकम, उप आयुक्त (प्रशासन), (तत्कालीन मालमत्ता अधिकारी) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मआ/स्वीस/२००५/२७ दिनांक १३/०१/२००५ अन्वये " एक वार्षिक वेतनवाढ (देय) कायमस्वरूपी रोखण्यात येते" या शिक्षेविरूध्द केलेल्या अपीलावर विलंब कालावधी क्षमापित करण्यासह विचार विनिमय करून निर्णय घेणे.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.रविंद्र निकम, उप आयुक्त (प्रशासन), (तत्कालीन मालमत्ता अधिकारी) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांचेकडे मालमत्ता अधिकारी पदाचा

अल्पकाळ अतिरीक्त पदभार असतांना हातगाडी चालकांना बिल्ले देण्याचा ठेका देण्याची कार्यवाही प्रथमतः प्रस्तावित करून मनपाचा महसूल वाढविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे श्री.निकम यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मआ/स्वीस/ २००५/२७ दिनांक १३/०१/२००५ विरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेले अपिल मंजुर करण्यात येते. तसेच अपिलासाठी झालेला विलंब क्षमापित करण्यात येतो. सदरील कार्यालयीन आदेश रद्द करण्यात येत असून त्यांची देय वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.